दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१६ डिसेंबर २०२४


## लासलगाव-विंचूर रस्ता अजून किती बळी घेणार ?



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील प्रगतीशील शेतकरी सोपान दरेकर यांचे चिरंजीव कै. चंद्रशेखर दरेकर यांचे काल रात्री साधारण साडेसात आठच्या दरम्याने अज्ञात वाहनाच्या धडकेने अपघाती निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने विंचूर व परिसरात आणि मित्र परिवारात शोककळा पसरली.

दिवसेंदिवस लासलगाव -विंचूर मार्गावरील अपघाताचे प्रमाण खूपच वाढत आहे. लासलगाव, विंचूर कांदा मार्केट असल्यामुळे काही व्यापाऱ्यांचे खळे व भूईकाटे हे विंचूर- लासलगाव रस्त्यालगत असल्याकारणाने ती रोडवर ट्रॅक्टरची व ट्रकची होणारी प्रचंड गर्दी, त्यात रस्ता दुपदरी, समोरासमोरुन येणारी वाहने, ओव्हरटेक करणारी वाहने, सफेद बल्पच्या लाईट मुळे समोरील वाहनांच्या अंतराचा चालकाला अंदाज येत नसल्याने, ही अपघाताची मालिका सुरूच आहे. या अपघातामुळे काही घरे तर पूर्ण संपली आहे.

सदर चार पदरी रोडचे काम लवकरात -लवकर सुरू करावे अशी संतप्त प्रतिक्रिया लासलगाव विंचूरकरांची होत आहे.

## ऑटोला अज्ञात वाहनाची धडक ! २ जागीच ठार तर १ गंभीर जखमी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१५, नांदेड :** भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने देगलूर कडून नांदेडला येणाऱ्या एका ऑटो रिक्षाला जबर धडक दिली.१४ डिसेंबरच्या मध्यरात्री कुंटूर पाटील जवळ झालेल्या अपघातात दोन जण जागी ठार झाले तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला असून सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत या अपघातातील एक मयत व जखमी एका कुटुंबातील असल्याचे समजते

या बाबत मिळाल्या माहिती नुसार देगलूर चा बाजार करून ऑटोमधुन नांदेडकडे घरी जाणा-या दोन छोट्या व्यापाऱ्यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला असुन हा अपघात नांदेड ते नायगाव महामार्गावरील गंगमवार यांच्या वेअर हाऊस समोर १४ डिसेंबर च्या रात्री आकराच्या सुमारास झाला आहे. हे वृत्त लिहीपर्यंत कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु होती. नांदेड शहरातील खडकपुरा येथील एजाज खान बल्ले खान व अफसर हुसेन हे दोन छोटे व्यापारी देगलूर येथील १४ डिसेंबर रोजीचा आठवडी बाजारात पिशव्या विकुन ऑटो क्रमांक एम.एच २६ बि.डी.८०३६ मधुन नांदेड कडे जात असताना कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदेड ते नायगाव महामार्गावरील गंगमवार वेअर हाऊस समोर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एजाज खान बल्ले खान व अफसर हुसेन यांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी आहे. दोन्ही मृतदेह नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उत्तरीय तपासणीनंतर त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. अपघातातील सर्व जखमींना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हालवण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक एस.खोले, पोहेका मोहण कंधारे, व्ही.इश्वरे आदींनी मदत केली. हे वृत्त लिहीपर्यंत कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु होती.

## सुप्रसिद्ध तबला वादक झाकीर हुसैन यांचं निधन



सुप्रसिद्ध तबला वादक झाकीर हुसैन यांचं निधन झालं आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे त्यांची पत्नी आणि दोन मुली असं कुटुंब आहे. झाकीर हुसैन यांना सॅनफ्रॅन्सिस्को येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरु होते, तसंच त्यांची प्रकृती गंभीर आहे असंही कळत होतं. मात्र उपचारांदरम्यान झाकीर हुसैन यांची प्राणज्योत मालवली. गेल्या अनेक वर्षांपासून झाकीर हुसैन यांचं वास्तव्य अमेरिकेतच होतं. झाकीर हुसैन आणि तबला हे समीकरण म्हणजे दिवा आणि ज्योत कशी असते अगदी तसंच होतं. वडील अल्लाह राखा खान यांच्याकडूनच त्यांनी तबलावादनाचे धडे गिरवले होते. मात्र याच अत्यंत विनम्र कलावंताचं निधन झालं आहे. इंडियन एक्स्प्रेसने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

**कोण होते झाकीर हुसैन?**

झाकीर हुसैन हे सुप्रसिद्ध तबलावादक अल्लाह राखा खान यांचे पुत्र होते. झाकीर हुसैन यांनी अनेक भारतीय आणि परदेशी चित्रपटांना संगीत दिलं आहे. 'साझ' या सिनेमात त्यांनी अभिनयही केला आहे. झाकीर हुसैन यांनी वडील अल्लाह राखा खान यांच्यासह तबला वादनाचे धडे वयाच्या सातव्या वर्षापासून गिरवण्यास सुरुवात केली. तसंच वयाच्या १२ व्या वर्षापासून झाकीर हुसैन देशभरात त्यांनी तबला वादन परफॉर्म करण्यास सुरुवात केली होती.

**झाकीर हुसैन यांचा अनेक पुरस्काराने गौरव**

१९८८ मध्ये झाकीर हुसैन यांना पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण, २०२३ मध्ये पद्मविभूषण या पुरस्करांनी गौरवण्यात आलं आहे. तसंच १९९० मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचा संगीत पुरस्कारही मिळाला होता. २००९ मध्ये झाकीर हुसैन ५१ व्या ग्रॅमी पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. उल्लेखनीय बाब ही आहे की झाकीर हुसैन यांना त्यांच्या कारकिर्दीत ७ वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालं होतं त्यापैकी चारवेळा त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. तबला नसांनसांमध्ये भिनलेला आणि रसिकांच्या हृदयात भिनवणारा कलावंत आज काळाच्या पडद्याआड गेला आहे.

# ...आणि अखेर मंत्रिमंडळ विस्तार झालाच!



### भाजपाच्या २० मंत्र्यांची यादी

| क्र. | मंत्र्याचं नाव | मंत्रीपद |
|---|---|---|
| १ | देवेंद्र फडणवीस | मुख्यमंत्री |
| २ | चंद्रकांत पाटील | कॅबिनेट मंत्री |
| ३ | मंगलप्रभात लोढा | कॅबिनेट मंत्री |
| ४ | राधाकृष्ण विखे पाटील | कॅबिनेट मंत्री |
| ५ | पंकजा मुंडे | कॅबिनेट मंत्री |
| ६ | गिरीश महाजन | कॅबिनेट मंत्री |
| ७ | गणेश नाईक | कॅबिनेट मंत्री |
| ८ | चंद्रशेखर बावनकुळे | कॅबिनेट मंत्री |
| ९ | आशिष शेलार | कॅबिनेट मंत्री |
| १० | अतुल सावे | कॅबिनेट मंत्री |
| ११ | संजय सावकारे | कॅबिनेट मंत्री |
| १२ | अशोक उईके | कॅबिनेट मंत्री |
| १३ | आकाश फुंडकर | कॅबिनेट मंत्री |
| १४ | जयकुमार गोरे | कॅबिनेट मंत्री |
| १५ | शिवेंद्रराजे भोसले | कॅबिनेट मंत्री |
| १६ | नितेश राणे | कॅबिनेट मंत्री |
| १७ | जयकुमार रावल | कॅबिनेट मंत्री |
| १८ | माधुरी मिसाळ | राज्यमंत्री |
| १९ | मेघना बोर्डीकर | राज्यमंत्री |
| २० | पंकज भोयर | राज्यमंत्री |

### शिवसेनेच्या मंत्र्यांची यादी

| क्र. | मंत्र्याचं नाव | मंत्रीपद |
|---|---|---|
| १. | एकनाथ शिंदे | उपमुख्यमंत्री |
| २. | गुलाबराव पाटील | कॅबिनेट मंत्री |
| ३. | दादा भूसे | कॅबिनेट मंत्री |
| ४. | संजय राठोड | कॅबिनेट मंत्री |
| ५. | उदय सामंत | कॅबिनेट मंत्री |
| ६. | शंभूराज देसाई | कॅबिनेट मंत्री |
| ७. | संजय शिरसाट | कॅबिनेट मंत्री |
| ८. | प्रताप सरनराईक | कॅबिनेट मंत्री |
| ९. | भरत गोगावले | कॅबिनेट मंत्री |
| १०. | प्रकाश आबिटकर | कॅबिनेट मंत्री |
| ११. | आशिष जैस्वाल | राज्यमंत्री |
| १२. | योगेश कदम | राज्यमंत्री |

### राष्ट्रवादी (अजित पवार) १० मंत्र्यांची यादी

| | |
|---|---|
| हसन मुश्रीफ | धनंजय मुंडे |
| हसन मुश्रीफ | दत्तात्रय भरणे |
| आदिती तटकरे | माणिकराव कोकाटे |
| नरहरी झिरवाळ | मकरंद जाधव |
| इंद्रनील नाईक | माणिकराव कोकाटे |

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, नागपूर :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक गेल्या म हिन्यात पार पडली. या निवडणुकीत भाजपाप्रणित महायुतीला मोठं बहुमत मिळालं. महाराष्ट्रात महायुतीने २८८ पैकी तब्बल २३५ जागा जिंकत विरोधकांचा सुपडा साफ केला. विरोधकांच्या महाविकास आघाडीला केवळ ४९ जागा जिंकता आल्या. मोठं बहुमत मिळवूनही महायुतीला सत्तास्थापनेसाठी १२ दिवस लागले. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने सत्तास्थापन केली. फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. अजित पवारांनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. दरम्यान, राज्यातील जनतेला महायुती सरकारच्या विस्ताराची प्रतीक्षा होती. अखेर सत्तास्थापनेनंतर १० दिवसांनी आज (१५ डिसेंबर) नागपुरात महायुती सरकारचा विस्तार झाला. महायुतीच्या एकूण ३९ नेत्यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.

महायुतीच्या ३९ नेत्यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. फडणवीसांच्या मंत्रिमंडळात आता भाजपाच्या २० शिवसेनेच्या (शिंदे) १२ व राष्ट्रवादीच्या (९) मंत्र्यांचा समावेश आहे. आज ३३ कॅबिनेट मंत्र्यांनी शपथ घेतली. तर सहा आमदारांना राज्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आली. यापूर्वी देखील राज्यात महायुतीचं सरकार होतं. मात्र, नव्या सरकारमध्ये काही नवे चेहरे पाहायला मिळणार आहेत. नव्या सरकारमध्ये भाजपाने नऊ, शिवसेनेने (शिंदे) सहा व राष्ट्रवादीने (अजित पवार) पाच नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

# डोंबिवली-कल्याणमध्ये एमएमआरडीएच्या कामांमुळे वाहतूक कोंडी...

## नागरिक व वाहतूक पोलिस त्रस्त !

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली-कल्याण परिसरातील एमएमआरडीएच्या प्रलंबित कामांमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, नागरिकांसोबतच वाहतूक पोलीससुद्धा यामुळे त्रस्त झाले आहेत.

एमएमआरडीएतर्फे सध्या या भागात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प, उड्डाणपूल आणि रस्त्यांचे रुंदीकरण प्रकल्प सुरू आहेत. मात्र, या कामांसाठी योग्य ती वाहतूक व्यवस्थापन योजना लागू न झाल्याने अनेक रस्ते आणि म हत्त्वाचे चौक सतत अडथळ्याने भरलेले आहेत. रस्त्यांवरील अपुरी पार्किंगची जागा आणि डाव्या-उजव्या वळणांचे अडथळे यामुळे वाहनचालकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः डोंबिवली स्टेशन रोड, पालवा सिटीजवळील भाग, शील-डोंबिवली मार्ग आणि कळवा-म्हाडा चौक येथे वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येते. नागरिक कामावर जाण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी करत असून, सार्वजनिक वाहतूक सेवेचाही फटका बसत आहे.

वाहतूक पोलिसांनी देखील मोठ्या प्रमाणावर कर्मचारी तैनात केले असूनही, कामांच्या ठिकाणी योग्य उपाययोजना न केल्याने हे आव्हान वाढतच आहे. स्थानिकांच्या मते, कामे मंद गतीने होत असल्याने ही समस्या अधिक दिवस टिकणार आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे विनंती केली आहे की, कामांचा वेग वाढवावा आणि पर्यायी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करून ही कोंडी कमी करावी. वाहतूक पोलिसांनी देखील एमएमआरडीए व महानगरपालिकेला या समस्येचे लवकर निराकरण करण्याकरता जोर लावावा तत्काल उपाययोजना केली नाही, तर पुढील वेळेत वाहन कोंडीची समस्या हाताबाहेर जाऊ शकते असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# कांद्याच्या रोपाला कांद्यापेक्षा अधिक भाव शेतकर्यांचा कांदा लागवडीकडे कल वाढला !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** रब्बी हंगाम कांदा पिकासाठी अधिक पोषक असल्याने शेतकरी कांदा लागवडीत मग्न आहेत. सध्या लागवडीसाठी मजूर मिळत नसले, तरी कुठूनही मजूर उपलब्ध करून कांदा लागवड शेतकरी करत आहेत. दिवसेंदिवस पारनेर तालुका वाटाणा पिकाबरोबर आता कांदा आगार ओळखला जाऊ लागला आहे. कांद्याला भाव वाढल्याने शेतकर्यांचा कांदा लागवडीकडे कल वाढला आहे.

कांदा रोपांनाही भाव वाढला आहे. परिसरात शेतकर्यांकडून बाजारात येणार्या कांद्याची आवक दरवर्षीच्या तुलनेत कमी-अधिक प्रमाणात होत आलेली आहे. कांदा बाजारात प्रतिकिलो ३० रुपयांपासून ते ५० रुपये दराने विकला जातो. पण कांद्याच्या रोपाला कांद्यापेक्षा अधिक भाव असून, सध्या एकरभर कांदा लागवडीच्या रोपासाठी ३० ते ३५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. कांद्यापेक्षा रोपाला अधिक भाव आल्याने यंदा कांद्याची लागवड म हागडी ठरत असली, तरी कांदा लागवडीसाठी शेतकर्यांची लगबग सुरू आहे. यंदा रोपांची मागणी वाढल्याने जिल्ह्यात



रब्बी हंगाम कांदा पिकांसाठी अधिक पोषक असल्याने शेतकरी कांदा लागवडीत मग्न आहेत. सध्या लागवडीसाठी मजूर मिळत नसेल, तरी कुठूनही मजूर उपलब्ध करून कांदा लागवड शेतकरी करत आहेत. कांद्याला भाव वाढल्याने शेतकऱ्यांचा कांदा लागवडीकडे कल वाढला आहे. कांदा रोपांनाही चांगला भाव वाढला आहे.

**- संदिप नाईकवाडी,**
**कांदा उत्पादक शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

६० ते ७० टक्के कांदा लागवड होण्याचा अंदाज आहे. सध्या तालुक्यातील शेतकर्यांकडे उन्हाळी कांदा लागवड सुरू आहे.

शेतकरी नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी महिन्यात मोठ्या प्रमाणात उन्हाळी कांद्याची लागवड करतात. अल्पभूधारक शेतकरी कांद्याच्या बियाण्यांपासून रोपे तयार करून योग्य त्या बाजारभावाने विक्री करतात. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये यंदा कित्येक शेतकर्यांचे टाकलेले कांदा रोपांची उगवण कमी झाली, तर काही शेतकर्यांचा रोप चांगले उतरले. अवकाळी पावसाने कांदा रोप घालवल्याने ज्या शेतकर्यांचे कांदा रोप टिकले त्यांनी आपली लागवड उरकून दुसर्या शेतकर्यांना चांगल्या भावात मोठ्या प्रमाणात कांदा रोपांची विक्री करत आहेत. काही शेतकरी मिळेल त्या भावात कांदा रोपे विकत घेत असून,आपली लागवड उरकून घेत आहेत. बाजार समितीत कांद्याची आवक वाढली की कांद्याचे भाव पडतात. कांद्याची टंचाई निर्माण होते तेव्हा भाव वाढतात. सध्या अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांकडे कांदा नसल्यामुळेच सध्या कांद्याला भाव वाढले आहे. त्यामुळे कांद्याच्या रोपालाही सुगीचे दिवस आले आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत कांद्याचे भाव स्थिर राहतील,असा अंदाज आहे. सध्या कांद्याला भाव चांगला असल्याचा परिणाम म्हणून अनेक शेतकऱ्यांची कांदा लागवडीकडे वळले आहेत.

# संपादकीय



## ‘लक्ष्या’

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला.

**विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

# चहाचे बदलते स्वरूप



**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

जगभरातील काही देशात १५ डिसेंबर हा दिवस वर्ल्ड टी डे- जागतिक चहा दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र, चहाचा व्यापार आणि चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या कामगारांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी २१ मे रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिवस साजरा केला जातो. आजच्या दिवसाचा उद्देश चहाच्या व्यापाराला प्रोत्साहन देणे आणि त्याच्या नैतिक आणि टिकाऊ उत्पादनावर लक्ष केंद्रीत करणे हा आहे. माझे प्रांजळ मत असे, की चहाची तलफ एक व्यसनच आहे, परंतु ते विडी, सिगारेट, तंबाखू किंवा दारू यांरखे हानीकारक मुळीच नाही. म्हणूनच जागतिक संघटनांकडून चहाला मान्यता प्राप्त झाली आहे.

चहाचे बदलते स्वरूप: दैनंदिन जीवनात चहाचे महत्व वाढत चालले आहे. आता आरोग्याच्या दृष्टीने नागरिकांचा ग्रीन टी, ब्लॅक टीकडे कल अधिक वाढत चालला आहे. चहाचे सेवन प्रमाणात केले, तर ते अमृताचे कार्य करते, असे तज्ज्ञांचे मत आहे. भारतात आसामच्या पर्वत भागात सन १८२४ दरम्यान चहाची पाने सापडली. त्यानंतर इंग्रजांनी सन १८३६पासून चहाचे उत्पादन सुरु केले. सुरुवातीला यासाठी चीनमधून चहाचे बी मागवले जायचे. त्यानंतर आसामच्या भागात चहाच्या बियांचा वापर सुरू झाला. भारतातील चहाचे उत्पादन हे ब्रिटनमधील चहाची मागणी पूर्ण करण्यासाठी केले जात असे. आज चहा भारतातील सर्वात स्वस्त आणि लोकप्रिय पेय आहे. आसामचा चहा सर्व जगभर प्रसिद्ध आहे. भारतील अनेक नागरीकांची आनंदी व उत्साही सकाळ चहा पिल्यानंतर सुरू होते. भारत, चीन, केनिया आणि श्रीलंका हे जगातील प्रमुख चहा उत्पादक देश आहेत. याव्यतिरिक्त, बांग्लादेश, यूगांडा, इंडोनेशिया, टांझानिया आणि मलेशिया या देशातही चहाचे उत्पादन घेतले जाते. चीन हा जगातील सर्वात मोठा चहाचा निर्यात कर्ता देश आहे. भारतातही चहाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. पण स्थानिक स्तरावर त्याचे सेवनही मोठ्या प्रमाणात केले जाते. भारतातील चहाच्या एकूण उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन हे भारतातच सेवन केले जाते.

चहाचे फायदे: चहामध्ये एंटीजन असतात, जे एंटी-बॅक्टेरियल क्षमता प्रदान करतात. चहामध्ये असलेला फ्लोराईड हाडांना मजबूत करतो व दातांना कीड लागण्यापासून थांबवतो. चहामध्ये कैफिन आणि टैनिन असतो, जो शरीराला स्फुर्ती प्रदान करतो. चहामध्ये असलेला अमिनो-एसिड डोक्याला शांत व चपळ ठेवण्यास मदत करतो. चहा हे म्हातारपण वाढण्याचा वेग कमी करतो, तसेच शरीर वाढीच्या नुकसानापासून वाचवतो. चहा शरीरातील एंटी- ऑक्सिडेन्स इम्युन सिस्टिम व्यवस्थित ठेवतो. जगात पाण्यानंतर चहा हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक सेवन केले जाणारे पेय आहे. उत्तर भारत, उत्तर म्यानमार आणि नैऋत्य चीन हे चहाचे उगमस्थान मानले जाते. येथील अनेक लहान-मोठी कुटुंबे चहाच्या शेतीत गुंतलेली आहेत. त्यामुळे चहाचा वापर आणि मागणी वाढवण्यावर भर देण्यासाठी दरवर्षी २१ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय चहा दिन म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय चहा दिनाचा उद्देश चहाचे उत्पादन वाढवून त्याबद्दल जागरूकता पसरवणे आणि भूक आणि गरिबीमध्ये त्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा आहे. चहाचा अर्थ फक्त दूध असलेला चहा असा नाही तर चहापानांचे इतरही अनेक प्रकार आहेत. अशा परिस्थितीत तुमच्यासाठी अशा ५ हर्बल टी- चहाचा उल्लेख करतो, जे सेवन केल्यास वजन कमी होण्यास मदत होते. १) ग्रीन टी- हिरवा चहा: वजन कमी करण्यासाठी अँटी-ऑक्सिडंटने समृद्ध ग्रीन टी प्यायला जाऊ शकतो. ग्रीन टीमध्ये कॅटेचिन असते, जे फॅट सेल्स कमी करते आणि फॅट बर्न करण्यास मदत करते. ते दिवसातून दोनदा प्यायला जाऊ शकतो. २) हळद चहा: हा हर्बल चहा घरी बनवता येतो. यासाठी तुम्हाला कच्ची हळद घ्यावी लागेल. कच्च्या हळदीचे छोटे तुकडे करून एक कप पाण्यात टाकून उकळा. त्यात तुम्ही सामान्य चहाच्या पानांचे काही दाणे टाकू शकता. तुमचा हळदीचा हर्बल चहा तयार आहे, तो गाळून प्या. हा चहा प्यायल्याने उच्च कोलेस्ट्रॉल कमी होते, वजन कमी होते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होण्यासही मदत होते. ३) तुळशी हर्बल चहा: हा चहा तुळशीच्या पानांपासून बनवून प्यायला जाऊ शकतो. तुम्ही तुमच्या सामान्य चहामध्ये तुळशीची पाने देखील घालू शकता किंवा काळ्या चहामध्ये तुळशीची काही पाने शिजवू शकता. हा चहा चयापचय प्रक्रियेसाठी विशेषतः चांगला आहे. ४) काळा चहा: जास्तीत जास्त ऑक्सिडेशन प्रक्रियेतून जावून ब्लॅक टी बनवला जातो. वजन कमी करण्यासाठी या चहाचा चांगला परिणाम होतो. काळा चहा दिवसातून दोन ते तीन कपपर्यंत प्याला जाऊ शकतो. पोट आणि कंबरेची चरबी कमी करण्यासाठी तुम्ही या चहाचे सेवन करू शकता. ५) ओलोंग चहा: ओलोंग चहा हा पारंपारिक चायनीज म्हणजेच चायनीज चहा आहे. त्याचा सुगंध फ्रूटी आहे आणि त्याची चव खूप वेगळी असते. चयापचय सुधारण्यासाठी आणि चरबी जाळण्याची शक्ती वाढवण्यासाठी ओलोंग चहाचे सेवन चांगले आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील चहाच्या योगदाविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी भारताने दिलेल्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्रसंघाने मान्यता दिली. युएनच्या मते २१ मे हा आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून घोषित केल्याने त्याचे उत्पादन आणि वापर वाढविण्यासाठी मदत मिळेल. ही मदत ग्रामीण भागातील भूक आणि गरिबीशी लढण्यासीठी महत्वाची ठरेल. संयुक्त राष्ट्राने त्यांचे सदस्य असलेल्या सर्व देश, आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनांना दरवर्षी २१ मे रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिन साजरा करण्याचे आवाहन केले. भारत, नेपाळ, बांग्लादेश, इंडोनेशिया, श्रीलंका, टांझानिया व्यतिरिक्त इतर अनेक देश १५ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिन साजरा करत आहेत. परंतु मे महिना हा चहा उत्पादनासाठी सर्वोकृष्ट महिना मानला गेल्याने युएनने निवडला आहे. दरम्यान, जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक असलेल्या भारतात काळ्या चहाचे उत्पादन २०२७पर्यंत १६.१ दशलक्ष टन होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सन २०१७मध्ये ते १२.६ दशलक्ष टन होते. तर, त्याच वेळी जगातील सर्वात मोठा उत्पादक असलेल्या चीनमध्ये ग्रीन टीचे उत्पादन सन २०१७मध्ये १५.२ दशलक्ष टनांवरून २०२७पर्यंत ३३.१ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे, हे येथे विशेष उल्लेखनीय!

**!! आंतरराष्ट्रीय चहा दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

## विज्ञान प्रदर्शनात गांधी बाल मंदिर हायस्कूलचे ‘सुयश’

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५ मुंबई :** २२ वे एल वॉर्ड विज्ञान प्रदर्शन विवेकानंद हायस्कूल नेहरू नगर कुर्ला येथे नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये गांधी बाल मंदिर हायस्कूल च्या शाळेने अनेक पारितोषिके पटकाविली.



शाळेच्या दक्षित केसरकर, अपूर्वा सकपाळ, आर्या पांगम, अस्मि भेकरे, राणाजी इंगळीकर, कृणाल मालप, जान्हवी ढमाळ या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये पारितोषिक पटकाविले. तर लोकसंख्या शिक्षण प्रकल्पत शिक्षक घनश्याम जोशी यांना द्वितीय क्रमांक, तसेच मिशन स्वच्छ भारत प्रकल्पत शिक्षक रुपेश नकाशे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सर्व विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक, सहाय्यक, मदतनीस यांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सदर प्रकल्पामध्ये चांद्रयान तीन चा लाइव प्रकल्प शाळेतील शिक्षक अवधूत चव्हाण व अमोल जागले यांनी तयार केला होता तर सेल्फी पॉईंट शिक्षक विश्वनाथ पांचाळ व रत्नकांत विचारे यांनी तयार केला. तसेच सानिया गिजे व सई या विद्यार्थिनींनी सुंदर असा चांद्रयान प्रकल्प साकारला. सर्व सहभागी विद्यार्थी, पालक, शिक्षक यांचे मुख्याध्यापक अनिल पांचाळ आणि पर्यवेक्षक रवींद्र खोंडे यांनी अभिनंदन केले आहे.

## पत्रकार दिनानिमित्त नागपूर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अधिवेशन

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१५ हदगांव (नांदेड) :** नवीन वर्षाच्या सुरुवातीला ६ जानेवारी २०२५ रोजी नागपूर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अधिवेशन घेण्याचे ठरले असून राज्यभरातील सर्व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी अधिवेशनाला उपस्थित रहावे असे आवाहन युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे.



अल्पवाधितच फक्त महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघटनेची बांधणी करून कमी वेळेत आपल्या कार्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त सदस्य संघटनेला जुळविले व संपूर्ण महाराष्ट्र तसेच देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत आहे.

समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर हे ब्रिद वाक्य समोर ठेवून एक वर्षाआधी युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली.

एवढ्या कमी वेळेत देशभरातील पत्रकारांना संघटनेशी जुळवून त्यांच्या अडिअडचणी व समस्या सोडवून पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी सदैव त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याचे काम युवा ग्रामीण संघ करत आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला ६ जानेवारी २०२५ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाला सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित रहावे.असे आवाहन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे.

## पदअपेक्षा..

मंत्री पद मिळणारं
सर्वां होती अपेक्षा
इच्छा अनुयायांची
जास्ती माझ्यापेक्षा

शक्ती प्रदर्शन केले
वाढल्या खूप कक्षा
नाव कसे वगळले
बदलून टाकी नक्षा

कळले नाही कशी
दिली असली शिक्षा
अव्वल येतो बोलता
नापास होई परिक्षा

झोळ्या माझ्याकडे
तिसरे वाटती भिक्षा
प्रिय असूनि शिष्य
दुस-यांना देई दिक्षा

घेऊन मोठी अपेक्षा
सोडूनि आलो पक्षा
तुटून पडता कुंपण
कोण करणार रक्षा

आता वाटते उगाचं
बंद पाडली रे रिक्षा
परतीचे दोर कापले
सगळीकडेचं उपेक्षा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# वाचक पत्र

## शाळांची बदलती स्नेहसंमेलने

सध्या शाळा आणि महाविद्यालयांची वार्षिक स्नेहसंमेलन सर्वत्र सुरु आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मुलांचे नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग यांसारखे कार्यक्रम यानिमित्ताने भरवले जातात. शिशुवर्गापासूनच्या मुलांना नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. प्रत्यक्ष कार्यक्रमाआधी महिनाभरापासून मुलांकडून कसून सराव करून घेतला जातो. बड्या खासगी शाळांकडून स्नेहसंमेलनासाठी वातानुकूलित शाही सभागृह आरक्षित केले जाते. संमेलनाला समस्त पालकांना निमंत्रित केले जाते. मुलांच्या वेशभूषेपासून सभागृहाच्या आरक्षणाचा आणि पाहुण्यांच्या चहा-पाण्याचा खर्चही बहुतेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या पालकांकड्न वसूल केला जातो. मुलांच्या शाळाप्रवेशासाठी लाखोंचे डोनेशन देणाऱ्या पालकांचीही याला हरकत नसते. आपली मुले पहिल्यांदा व्यासपीठावर नृत्य करणार या कल्पनेनेच गदगद झालेले पालक आपल्या पाल्याचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन जातीने उपस्थित राहतात. प्रत्यक्षात कार्यक्रम पाहताना एकसारखी वेशभूषा केलेल्या २५-३० मुलांच्या गराड्यात आपले बाळ ओळखताना पालकांचाही वेळ जातो. बाळाला केंद्रित करून बाळाचे नृत्य आपल्या मोबाईलमध्ये ध्वनिचित्रित करताना बिचाऱ्या पालकांनाही चांगलीच कसरत करावी लागते. हल्ली टीव्ही चॅनल्सवर चालणाऱ्या लहान मुलांच्या नृत्याच्या रिऍलिटी शोजचा परिणाम या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांवरसुद्धा सध्या पडू लागला आहे. आपल्याकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात बालगीते आणि बडबड गीतांचे भांडार असताना काही शाळांत दुसरी तिसरीच्या कोवळ्या मुलांना हिंदी चित्रपटातील रोमँटिक अथवा आयटम साँग्सवर नाचवले जाते. ज्या गाण्यातील शब्दांचा अर्थही मुलांना माहीत नसतो अशा गाण्यांवर मादक हालचाली आणि हातवारे करणाऱ्या या कोवळ्या मुलांच्या नृत्यावर हसावे कि रडावे हेही नेमके कळत नाही. विशेष म्हणजे उपस्थित पालकही अशा नृत्यांच्या सादरीकरणावर बेहद खुश होऊन शिट्या आणि टाळ्यांची बरसात करतात. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्नेहसंमेलनातून मुलांवर कुसंस्कार तर होत नाहीत ना याचे भान शाळा व्यवस्थापनाने राखायला हवे !

**- सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विंचूर शहरात काही बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करण्याची मागणी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र सरकारच्या निदर्शना नुसार सर्व सरकारी कार्यालय, शाळा, कॉलेज व इतर सार्वजनिक स्थळावर सीसीटीव्ही कॅमेरे लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. विंचूर शहरातील लाखो रुपये खर्च करून बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे काही आडोशाला तर काही दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत आहेत. शहरात अपघात, वाहतूक कोंडी, काही चौकामध्ये होणारी गुंडागर्दी वाढत असल्याने सीसीटीव्ही सुरू करण्याची मागणी विंचूर शहरातील नागरिकांनी केली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे म्हणजे सुरक्षितेचा तिसरा डोळा आहे. ज्यामुळे त्यांची एक प्रकारे सर्वावर दहशत (नजर) असते. गुन्ह्याचा तात्काळ उलगडा होण्यास मदत होते. विंचूर चौफुली, शाळा, ग्रामपालिका रोड या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त झाले होते. पोलीस खात्याला ही चांगली मदत होत होती. विंचूर शहरात कॅमेऱ्याची यंत्रणा कार्यान्वित झाल्याने गावात होणारी टवाळखोरी, छेडछाडी, मारामारी, मोटर सायकल चोरी, घरफोडी असे गैरप्रकार यांचे प्रमाण कमी झाले होते. या सीसीटीव्ही यंत्रणेत वाहनाचा नंबर प्लेटसह दृश्य कॅमेऱ्यात टिपले जात असल्याने, पोलिसांचा अप्रत्यक्षरीत्या वचक वाढला होता.विंचूर चौफुलीवर, शाळा, कॉलेज, ग्रामपालिका रोड व नाक्या- नाक्यावर, त्या ठिकाणी काही गैरप्रकार, गर्दी, वाहतूक कोंडी झाली असता, विंचूर पोलीसांना त्या बाबीवर लक्ष ठेवता येते होते. मात्र काही दिवसापासून काही कॅमेरे बंद तर काही कॅमेरे चालू असल्यामुळे पोलीस यंत्रणेनेला लक्ष ठेवण्यास मोठा अडथळा निर्माण होत आहे. विंचूर शहरात अपघात, वाहतूक कोंडी व इतर कारणास्तव यांचे प्रमाण आधीक वाढत असल्याने सीसीटीव्ही सुरू करण्याची मागणी विंचूर शहरवासीयांकडून होत आहे.

## पनगावमध्ये श्री.दत्त जयंतीनिमित्त कीर्तन



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१९, रेणापूर (लातूर) :** रेणापूर तालुक्यातील पानगांव येथील ब्राह्मण

गल्लीमधील श्री दत्त मंदिरामध्ये दरवर्षी श्री दत्त जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. रोज सकाळी श्री दत्ताची नित्य पुजा दुपारी श्री दत्ताची आरती भिक्षा तसेच श्री दत्त चरित्राचे पारायण तसेच प्रवचन, भजन, कीर्तन असे विविध कार्यक्रम ठेवले जातात. दिनांक ०८ डिसेंबर २०२४ पासून सुरु झालेल्या श्री दत्त जयंती उत्सवाला प्रारंभ झाला. दिनांक १४ डिसेंबर २०२४रोजी संध्याकाळी ह.भ.प कांतु महाराज पांडे यांचे कीर्तन ठेवण्यात आले होते. तसेच संध्याकाळी ६ वाजता गुलाल उधळून श्री दत्त जन्म करण्यात आला. तसेच श्री दत्ताची आरती करण्यात आली. तसेच दिनांक १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते २ ह.भ.प कांतु महराज पांडे यांचे काल्याचे कीर्तन व श्री दत्ताची आरती महाआरती व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पानगाव परिसरातील भजनकरी,विणेकरी आणि महिला भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गहाळ झालेले सोन्याची बॅग तांत्रिक व कौशल्याने पोलिसांनी केले हस्तगत



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१५, डोंबिवली (ठाणे) :** कर्नाटक वरून मुंबईत एका लग्नाचे कार्यक्रमासाठी दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी दांपते आले होते. त्या दाम्पत्याचे नाव नागराज कर्करा आणि भारती कर्करा यांनी घाटकोपर ते डोंबिवली असे रिक्षाने प्रवास केले असता ते डोंबिवली टिळकनगर पोलीस ठाण्याचे हद्दीत उतरले. उतरल्यानंतर भारती कर्करा आपले पर्स रिक्षात विसरल असून पर्समध्ये गळ्यातली नेकलेस , सोन्याचे बांगड्या, २ अंगठ्या, कानातील रिंग असे एकूण ग्रॅम १७६/-सोन्याची किंमत किंमत १२,९५,५०० /रोख रक्कम असे त्यात होते. पर्स गहाळ झालेले तक्रार पोलीस ठाण्यामध्ये दाखल झाल्यानंतर यासंदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांना कळवण्यात आले. विजयकुमार कदम यांनी आपल्या पोलीस ठाण्यामधील तपास यंत्रणा राबवून ते स्वतः या तक्रारीचे अनुषंगाने तपास अधिकारी व अंमलदार नावे पोलीस उपनिरीक्षक चौगुले पोलीस हवालदार कांबळे पिंजारी पगारे पोलीस शिपाई राठोड, मुंडे सोबत सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक यंत्रणाद्वारे व कौशल्याने आपल्या वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली त्या रिक्षाच्या शोध घेतले. ते रिक्षा (क्रमांक चक ४३इठ ९४४६) कमल जयस्वाल असे ते रिक्षा चालकांच्या असून त्या रिक्षा चालकाला ऐरोली चिंचपाडा या ठिकाणी हुन ताब्यात घेण्यात आले ताब्यात घेतल्यानंतर सखोल चौकशी व विश्वासात घेऊन ती बॅग हस्तगत करून नागराज कर्कर आणि भारती कर्कर यांना सोपवण्यात आले .

## महिलांना अनुदानावर पिंक ई-रिक्षा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, अमरावती :** महिला व बालविकास विभागामार्फत राज्यातील महिलांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करण्यासाठी, तसेच महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्यासाठी पिंक ई- रिक्षा उपलब्ध करून दिली जाणार आहे. महिलांना रोजगारासह प्रवासी महिलांनाही सुरक्षित प्रवास करता यावा, हा योजनेमागील उद्देश आहे. या योजनेत राज्य शासनाकडून २० टक्के अनुदान मिळणार आहे तसेच ६०० महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पिंक ई-रिक्षा योजनेतून महिला व मुलींच्या रोजगारनिर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, स्त्री सशक्तीकरणास चालना देणे, महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी नोकरी, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसाहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ई-रिक्षा उपलब्ध करणाऱ्या कंपनीच्या माध्यमातून महिलांना परवाना, परमिट, बॅच बिल्ला, प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे विधवा महिलांसाठी मोफत शिबिराचे आयोजन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१५, दिवा (ठाणे) :** महिलांचे प्रश्न त्यांच्यावर समस्या यांवर चर्चा करून त्यांच्या कर्तृत्वाच्या वेद घेतला जातो. हे या आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा वैशिष्ट्य आहे. स्त्री ही मुळातच सक्षम आहे. आई म्हणून एक बहीण म्हणून किंवा एक बायको म्हणून ती नेहमीच सक्षम राहिली आहे.

पण दुर्दैवाने म्हणावे लागेल की कधीकधी स्त्रिच स्त्रिची शत्रू होते. समाजामध्ये उंची गाठलेल्या महिला तळागाळातील महिलांकडे दुर्लक्ष करतात. पण आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा ही तळागाळातील स्त्रियांना सक्षम बनवण्यासाठी नेहमीच




पुढाकार घेत असते. या अगोदर सुद्धा अनेक उपक्रम राबवून महिलांना स्वतःच्या पायावर उभं करण्याचं काम आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे करण्यात आले आहे.

आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे विधवा महिलांसाठी मोफत शिबिराचे आयोजन दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी आगासन फाटक, आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान च्या ऑफिस मध्ये सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. यासाठी दिवा शहरातील विधवा महिलांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्षा उषा मुंडे यांनी केले आहे.

पेन्शन योजना, रोजगारासाठी महिलांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. श्रम कार्ड, आयुष्मान कार्ड विधवा महिलांना काढून देणार आहेत.

## आ. दातेंनी घेतला तहसील, पंचायत समिती कामकाजाचा आढावा

### ठेकेदारांच्या मनानूसार कामे करू नका...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी महसूल विभाग व पंचायत समिती आढावा बैठक पंचायत समिती कार्यालय पारनेर येथे घेण्यात आली. यावेळी तहसीलदार गायत्री सौंदाणे, बी.डि.ओ. दयानंद पवार यांच्यासह तालुका कृषी अधिकारी गजानन घुले उपस्थितीत होते.

यावेळी आमदार दाते म्हणाले सन २०२२ पासून शासनाच्या योजनांची काही कामे प्रलंबित आहेत, ते कोणत्या कारणाने थांबले, प्रलंबित का आहेत याची माहिती घेऊन ते लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी आपल्याला आढावा बैठका घ्याव्या लागतील. मला कामाचा अनुभव आहे परंतु मला तुमच्याकडून समजून घ्यायचे आहे. मी सत्ताधारी पक्षाचा आमदार आहे त्यामुळे आपल्याला कुठल्याही प्रकारच्या आर्थिक किंवा प्रशासकीय बाबींची अडचणी येणार नाही. शासनाचं मला संपूर्ण सहकार्य असणार आहे. शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी तुम्हाला आणि मला एकत्र काम करायचं आहे.

त्यामुळे अवास्तव कोणाला त्रास होईल अशी भूमिका माझी नसणार आहे. मला तुमच्याकडून एकच अपेक्षा आहे जी कामे असतील ती दर्जेदार झाली पाहिजे, वेळेत पूर्ण व्हावी त्यातून काही तक्रारी येणार नाहीत याची दक्षता तुम्हाला घ्यावी लागेल. मला अपेक्षित असलेला तालुका मला घडवायचा आहे. यासाठी तुमच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा आहे. ठेकेदारांच्या मनावर कामे करू नका, शासनाचा पैसा आहे त्याचा योग्य वापर झाला पाहिजे कामावर सुपर व्हिजन केले गेले पाहिजे अशा सूचनाही आमदार दाते यांनी दिल्या.

यावेळी वनक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, सुपा पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड, सहाय्यक निबंधक विकास जाधव, सब रजिस्ट्रार डी.जी. गायकवाड, सा. बां. उपाभियंता एसबी वसईकर, पारनेर सहा. पोलीस निरीक्षक जे.सी. मुजावर, सीडीपीओ जयश्री उदावंत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे, एम एस सी बी उपअभियंता सारंग हतोळकर, आगार प्रमुख कुसकर इत्यादी अधिकारी उपस्थितीत होते.

## नेतृत्व निर्मितीची ताकद तरुणाईत- प्रकल्प समन्वयक राजेश्वरी मंडगे



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा यशवंतराव चव्हाण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व विद्यार्थी विकास मंडळ संयुक्त विद्यमाने ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे यांच्या समन्वयातून अग्रदूत नेतृत्व विकास कार्यशाळा संपन्न झाली.

प्रारंभी सर्व मार्गदर्शक प्रशिक्षकांचे प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक अग्रदूत पुणे जिल्हा समन्वयक राजेश्वरी मंडगे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाल्या नेतृत्व निर्मितीची ताकद तरुणाईत असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी संस्थेचा अग्रदूत कसा व कोणत्या क्षेत्रात काम करतो याची विस्तृतपणे माहिती दिली.

आशय समन्वयक संकेत भंडारे यांनी विद्यार्थ्यांमधील विकसित होण्यासाठी महाविद्यालयीन जीवनात कोणते सुप्त गुण असावेत नेतृत्व करण्याची क्षमता विकसित होण्यासाठी प्रकल्प हाती घेतल्यावर गटचर्चा, गटकार्य चे महत्व आणि उद्देश पूर्तता यासाठी कसे काम करावे याबद्दल संवाद प्रश्न उत्तर रुपी मार्गदर्शन केले. समन्वयक सूरज पाल व यश देवाळकर यांनी विविध कृतीकार्यातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा शोध घेतला.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालय स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार यांनी आभार विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा.सुचेता मोरे यांनी केले. यावेळी सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त व कृतीपूर्ण सहभाग घेत अग्रदूत नेतृत्व शिबिराचा पहिला टप्पा पूर्ण केला.

यावेळी प्रा.डॉ.प्रतिभा पाटणे, प्रा.सीमा पवार, प्रा.निकिता पवार, प्रा.प्रतीक्षा माने, प्रा.शर्मिला सावंत, प्रा.अस्मिता येवले, प्रा.प्राची गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. धनंजय गायकवाड, हणमंत यादव यांनी परिश्रम घेतले.

## आकाश फुंडकरांची मंत्रीपदी वर्णी...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यासह राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधलेल्या राज्य मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षित विस्तार आज रविवारी होत आहे. यात जिल्ह्यातील एका भाजप आमदाराची वर्णी लागणार आणि आमदार संजय कुटे हे चर्चेत आघाडीवर असल्याचे वृत्त होते. मात्र त्यांच्याऐवजी खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांना काहीशा अनपेक्षितरित्या लाल दिवा मिळणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांना आज दस्तुरखुद्द 'देवा भाऊंचा' फोन आला आणि त्यांनी मंत्रिपदाची 'गुड न्यूज' दिली! यामुळे खामगावमधील पदाधिकारी आणि फुंडकरांचे समर्थक, चाहते आज रविवारी, १५ डिसेंबर रोजी सकाळी नागपूरकडे रवाना झाले आहेत.



मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेल्या भाजपच्या आमदारांना स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फोन करणार हे काल परवा स्पष्ट करण्यात आले होते. त्याप्रमाणे आमदार फुंडकर यांना आज रविवारी १० वाजेच्या आसपास मुख्यमंत्र्यांचा फोन आला असून त्यांना ही शुभवार्ता देण्यात आली. आमदार फुंडकर निकटवर्तीय पदाधिकाऱ्यांनी याची पुष्टी केली.

### भाजयुमो ते मंत्री

दरम्यान भाजपचे ज्येष्ठ नेते तथा भाजपला बहुजन चेहरा प्रदान करण्यात अग्रेसर नेते अशी ओळख असलेले पांडुरंग फुंडकर यांचे सुपुत्र आमदार आकाश फुंडकर यांची प्रारंभिक ओळख. राजकारण आणि समाजकारण यांचे बाळकडू घरातच मिळालेले आकाश फुंडकर हे संघाचे द्वितीय वर्ग प्रशिक्षित असून ते सन २००२-०३ मध्ये अभाविपचे खामगाव नगरमंत्री होते. भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष म्हणून २००३-०४ त्यांनी जबाबदारी सांभाळली असून सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश केला. नंतर ते भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष होते.

### ...आणि आमदारकी

दरम्यान २०१४ मध्ये भाजपने संधी दिल्यावर ते खामगावचे आमदार झाले. काँग्रेसचे आमदार दिलीप सानंदा यांना पराभूत करून ते 'जायंट किलर' ठरले. यानंतर २०१९ आणि २०२४ मध्ये विजयी होऊन त्यांनी यंदा आमदारकीची हॅटट्रिक केली. पक्षाचे निष्ठावंत म्हणून ओळख असलेल्या या युवा नेत्याने यंदाही मंत्रिपदासाठी 'लॉबिंग' करण्याचे टाळले. दीर्घ प्रतिक्षेनंतर त्यांना मंत्रिपद मिळाले आहे.

### संजय कुटे यांना मोठी संधी

दरम्यान मंत्रिपदासाठी जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे यांचे नाव आघाडीवर असताना ते मागे पडले. मात्र त्यांचा 'पत्ता कट' झाला नसून त्यांना मोठे पद मिळणार असल्याचे वृत्त आहे. भाजप प्रदेशाध्यक्षपदासाठी आमदार कुटे यांचे नाव आघाडीवर असल्याचे वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासोबत कुटे यांचे नावही चर्चेत आले आहे.

## तरुणीचे हत्या प्रकरण, मारेकऱ्याला आजन्म कारावास

**दि.१५, ठाणे :** ठाण्यातील एका तरुणीच्या हत्या प्रकरणी मारेकरी आकाश पवार याला ठाणे न्यायालयाने आजन्म कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. २०१८ मध्ये एकतर्फी प्रेमातून आकाश पवार याने भररस्त्यात तरुणीची चाकूने हल्ला करून हत्या केली होती.

ठाण्यातील एका महाविद्यालयात तरुणी शिकत होती. ४ ऑगस्ट २०१८ या दिवशी सकाळी ११ वाजता ती पूर्व द्रुतगती महामार्गावरून जात असताना आकाश पवार याने तिला भर रस्त्यात गाठले. आकाश पवार हा तिच्यावर एकतर्फी प्रेम करत होता. त्यास नकार दिल्याने आकाश याने तिच्यावर चाकूने हल्ला करत तिची हत्या केली होती.

याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आकाश पवार याला पोलिसांनी अटक केली होती. त्याच्या विरोधात ठाणे सत्र न्यायालयात ३१ अक्टोबर २०१८ मध्ये नौपाडा पोलिसांनी शवविच्छेदन आहवाल, साक्षीदार यांचे जबाब, प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवून न्यायालयात आरोप पत्र सादर करण्यात आले.

# आ.खरे यांच्या हस्ते २ कोटी ७० लाख रुपये कामाचा शुभारंभ

## अडीच कि.मी काँक्रिटकरण रस्ता अन् साईड गटार कामासाठी सुरुवात

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** मोहोळ विधानसभा मतदारसंघातून तयारी सुरू असतानाही आमदार राजाभाऊ खरे यांनी आपल्या भागाचा ही विकास झाला पाहिजे. ही भूमिका पार पाडण्यासाठी पंढरपूर मतदार संघात येणाऱ्या म हत्त्वाच्या रस्त्यासाठी २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मिळवला होता. तर याच रस्त्याच्या कडेला असलेल्या शाळेची संरक्षक भिंत आणि परिसरात केवळ ब्लॉक टाकण्यासाठी २० लाख रुपये असा एकूण २ कोटी ७० लाख रूपये खर्चून होणाऱ्या शुभारंभ मोहोळ मतदार संघाचे आ.राजाभाऊ खरे यांच्या हस्ते करण्यात आला आहे. यामुळे गोपाळपूर भागातील शेतकऱ्यांसह, स्वेरी कॉलेजकडे जाणाऱ्या विद्यार्थी अन् या भागातील नागरिकांचा मोठा प्रश्न मिटणार आहे. आ.राजाभाऊ खरे हे २०१४ पासून गोपाळपूर येथील बनसोडे मळा याठिकाणी वास्तव्यास आले आहेत. त्यापूर्वी या भागातील रस्त्यांची खूप दुरवस्था होती. पावसाळ्यात या भागातील शाळेत येणाऱ्या विद्यार्थी आणि शेतकरी याना गुडघाभर चिखलातून ये जा करावी लागत होती. हा रस्ता मुरमिकरण करण्यात आला होता. या भागातील रहदारी वाढत असल्याने आ. राजाभाऊ खरे यांच्या प्रयत्नातून पंढरपूर मंगळवेढा रस्त्यापासून संतोष बनसोडे ते खरे फार्म हाऊस आणि खरे फॉर्म हाऊस ते स्वेरी कॉलेज हा अडीच कि.मी लांब आणि १२फूट रुंद रस्ता होणार आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी साईडला ४ फुटाचे सिमेंट काँक्रिटचे साईड गटारही करण्यात येणार आहे.

राज्यात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना वरील कामे मंजूर करून घेण्यात आली होती. गोपाळपूर भागातील विकासांसाठी जवळपास ५ कोटी २० लाख रुपयाचा निधी आ. राजाभाऊ खरे यांच्या प्रयत्नाने मंजूर केला आहे. यापैकी ग्रामविकास विभागातून दीड कोटी रुपये खर्चातून ग्रामसचिवालय बांधण्यात येत आहे. या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. गोपाळपूर येथील अंतर्गत रस्त्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून ५० लाख आणि ग्रामविकास विभागातून ५०लाख असा निधी मंजूर करुन घेतला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानी केवळ आ. राजाभाऊ खरे यांचेसाठीच वरील निधी देण्यास भाग पाडले होते. हा गोपाळपूर भाग पंढरपूर मतदार संघात आहे. या विकासांसाठी आतापर्यंत जे आमदार होऊन गेले आहेत. त्यांनी एवढा मोठा निधी आणि तो महत्वाच्या रस्त्याची सोय कधीही पहिली नव्हती. मात्र आ. खरे यांनी गोपाळपूरसाठी भरीव योगदान दिल्याने या भागातील जनताही कायम आ. खरे यांच्या पाठीशी आसेल असेही बोलले जात आहे. वरील झालेल्या या कामाचे शुभारंभ प्रसंगी सरपंच अरुण बनसोडे, सदस्य राजेंद्र बनसोडे , संतोष बनसोडे, राहुल बनसोडे, तानाजी बनसोडे, अनिल बनसोडे, विजय खरे, समाधान बाबर, ठेकेदार बंटी खरात यांचेसह आ. राजाभाऊ खरे समर्थक कार्यकर्ते उपस्थित होते.



### पंढरपूरच्या मालकशाहीसाठी यापुढची तयारी...!

या कामाच्या शुभारंभ प्रसंगी पत्रकारांशी बातचीत केली. यावेळी आ. खरे यांनी वरील सर्व निधी मिळविण्यासाठी सहकार्य केलेले माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गिरीष महाजन, खा.संदीपान भूमरे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आ.भरतशेठ गोगावले सह अनेकांचे आभार व्यक्त केले.त्यांनतर मोहोळ विधानसभा मतदारसंघातून आपण निवडणूक लढवत असताना, मोहोळ तालुक्यातील मालकशाही संपवण्याचा विडा उचलला होता. ही मालकशाही संपवत असतानाही आपल्या पंढरपूर तालुक्यातील मालकशाहीनेही मला विरोध केला आहे. मला पराभूत करण्यासाठी वाटेल ती तयारी ठेवली होती. मी आपल्या भागासाठी मोठा निधी आणूनही १७ गावातून त्यांनी मला विरोध केला आहे. यामुळे यापुढील काळात, पंढरपूर तालुक्यातील नगरपालिका आणि पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीतही आमदार अभिजीत पाटील यांच्या बरोबरीने राहून समविचारी लोकांना सोबत घेत, दोन्ही शिवसेना आपल्याबरोबर घेवून या मालकशहीला धडा शिकविणार अन् परिवर्तन घडविणार असा निर्धार आ. राजाभाऊ खरे यानी बोलून दाखविला आहे.

# आता पुढाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची चिंता

## नेत्यांची चाचणी सुरू; वरिष्ठांकडे कार्यकर्त्यांची फिल्डिंग

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. यामध्ये महायुती सरकारने दैदिप्यमान यश संपादन केले. यामध्ये भाजपने न भूतो भविष्यतो विजय संपादन केला आहे. तर महायुतीचे घटक पक्ष शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने सुद्धा जोरदार मुसंडी मारत विजय संपादन केला. यामध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे व अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. नागपूरमध्ये आज ३९ आमदारांनी शपथ घेतली आहे. बाकीचे मंत्रिमंडळ लवकरच स्थापना होईल. केंद्रात आणि राज्यात भाजपा सरकार असल्यामुळे सध्या सर्वत्र कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यामध्ये जोरदार आनंदी आनंदमय वातावरण आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुका संपल्यानंतर गावगाड्यातील गाव पुढाऱ्यांना आता वेध लागले आहेत.

गेली दोन - अडीच वर्षांपासून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपंचायत व ग्रामपंचायतीच्या निवडणुका आता तरी होतील व गावातील प्रशासकावर सुरू असणारा कारभार लोकप्रतिनिधींच्या ताब्यात येईल यामुळे खरे तर विकासकामांना गती येईल व सर्व सामान्य जनतेची रखडलेली कामे लोकप्रतिनिधी म्हणून मार्गी लागतील. यामुळे गावगाड्यातील गाव पुढारी चांगलेच हपापलेले आहेत. पण शासन या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी लावते याकडे गावगाड्यातील पुढारी लक्ष ठेवून आहेत. सध्या सर्वत्र गावागावात याची जोरदार चर्चा सुरू झाली. सध्या महाराष्ट्रात भाजप प्रणीत महायुतीचे सरकार सत्तेत असल्याने सरपंच, नगराध्यक्ष याची निवड थेट जनतेतून होणार हे तर निश्चितच झाले आहे. यामुळे गावगाड्यात गावचा सरपंच होण्यासाठी सर्व गुणसंपन्न व आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारे उमेदवारांची चाचपणी सध्या गावगाड्यात सुरू झाल्या आहेत. तर जिल्हा परिषद व पंचायत समितीला कोणते आरक्षण आहे यावरून इच्छुकांमध्ये सध्या चढाओढ लागली असून चर्चा सुरू झाली आहे.

### जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका कधी होणार ?

सध्या गावगाड्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आगोदर होणार का ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार याची ही जोरदार चर्चा सुरू आहे. आता लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांच्याच निवडणुका होणार आहेत. याकडे सध्या गावगाड्यातील सर्वच पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे नागपुरकरांच्या वतीने अभूतपुर्व स्वागत

## नागपुरकरांसाठी अभिमानाचा क्षण; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, नागपूर :** राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर नागपूर येथे आगमनाप्रसंगी नागपुरकरांनी विमानतळावर अलोट गर्दी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभूतपुर्व स्वागत केले.

नागपुरकरांसाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी समाज माध्यमांवर आपल्या भावना व्यक्त करीत त्यांच्या निवासस्थानाजवळ छत्रपती चौक येथे प्रेमाने अलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. विमानतळावर उतरल्यानंतर त्यांनी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.



यावेळी अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम, माजी राज्यमंत्री सुलेखाताई कुंभारे, पीरिपाचे कार्याध्यक्ष जयदीप कवाडे, सुभाष पारधी ॲड. राहूल झामरे, अनुसूचित जाती मोर्चाचे सतीश शिरसवान व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामदार चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्यासमवेत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळ मार्गावर प.पू. हेडगेवार स्मारकास भेट देऊन या ठिकाणी स्वातंत्र्य देवीच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली.

या भव्य विजयी मिरवणूकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस आर्वजून सहभागी झाल्या होत्या.

सोमलवाडा चौक, राजीव नगर, छत्रपती चौक, खामला, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर, बजाज नगर, शंकरनगर, लक्ष्मी भुवन चौक या ठिकाणी स्थानीक नागरिक, कार्यकर्ते, पदाधिकारी व मोठ्या संख्येत लाडक्या बहीणींनी या भव्य मिरवणुकीत सहभाग घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

# आवक वाढल्याने कांदा, टोमॅटो, फ्लॉवरच्या दरात घट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, पुणे :** मार्केट यार्डातील घाऊक बाजारात आवक वाढल्याने कांदा, टोमॅटो, फ्लॉवरच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी घट झाली. शेवग्याच्या दरात घट झाली असून, अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली.

कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून २ ते ३ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ ते ३ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ९ ते १० टेम्पो गाजर,

मध्य प्रदेशातून १८ ते २० ट्रक मटार, तामिळनाडूतून १ टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेशातून ९ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

# थोडक्यात

## देगावच्या कर्जबाजारी शेतकऱ्यांची आत्महत्या

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१५, नांदेड :** अर्धापूर तालुक्यातील देगाव येथील कर्ज बाजारी शेतकरी दिनेश दशरथ जाधव वय ३५ यांनी खाजगी तसेच बँकेचे कर्ज कसे फेडावे. या धास्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. भाऊ भारत दशरथ जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मयत दिनेश दशरथ जाधव यांनी खाजगी बँकेच्या कर्जाची परतफेड करून ही सातबारा वरील बोजा बँकेचा बोजा कमी करून दिल्या जात नसल्याने चिंतेत होता. सन २०१९ मध्ये राधाही इंडिया लिमिटेड शाखा नांदेड या खाजगी बँकेचे अंदाजे कर्ज एक लाख २० हजार रुपये काढले होते. निसर्ग पोकल्याने दरवर्षी होत असलेल्या नापिकीने आणि वारंवार वेळोवेळी कर्जाचे हप्ते भरून ही सातबारा वरून कर्जाचा बोजा कमी केल्या जात नव्हता. या मानसिक तणावातील मयत दिनेश दशरथ जाधव यांनी गावाच्या शिवारात माधव नामदेव जाधव यांच्या गोठ्यात टिनच्या पत्राला दोरीने गळफास घेऊन जीवन संपवण्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बारड पोलीस ठाण्यात कर्जबाजारी आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस डब्ल्यू केदासे एन के सिंगरवाड, चक्रधर पवार शेख अझर हे करित आहेत.

## डोंबिवली-कल्याणमध्ये एमएमआरडीएच्या कामांमुळे वाहतूक कोंडी

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली-कल्याण परिसरातील एमएमआरडीएच्या प्रलंबित कामांमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, नागरिकांसोबतच वाहतूक पोलीससुद्धा यामुळे त्रस्त झाले आहेत. एमएमआरडीए तर्फे सध्या या भागात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प, उड्डाणपूल आणि रस्त्यांचे रुंदीकरण प्रकल्प सुरू आहेत. मात्र, या कामांसाठी योग्य ती वाहतूक व्यवस्थापन योजना लागू न झाल्याने अनेक रस्ते आणि महत्त्वाचे चौक सतत अडथळ्याने भरलेले आहेत. रस्त्यांवरील अपुरी पार्किंगची जागा आणि डाव्या-उजव्या वळणांचे अडथळे यामुळे वाहनचालकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः डोंबिवली स्टेशन रोड, पालवा सिटीजवळील भाग, शील-डोंबिवली मार्ग आणि कळवा-म्हाडा चौक येथे वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येते. नागरिक कामावर जाण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी करत असून, सार्वजनिक वाहतूक सेवेचाही फटका बसत आहे. वाहतूक पोलिसांनी देखील मोठ्या प्रमाणावर कर्मचारी तैनात केले असूनही, कामांच्या ठिकाणी योग्य उपाययोजना न केल्याने हे आव्हान वाढतच आहे. स्थानिकांच्या मते, कामे मंद गतीने होत असल्याने ही समस्या अधिक दिवस टिकणार आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे विनंती केली आहे की, कामांचा वेग वाढवावा आणि पर्यायी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करून ही कोंडी कमी करावी. वाहतूक पोलिसांनी देखील एमएम आरडीए व महानगरपालिकेला या समस्येचे लवकर निराकरण करण्याकरता जोर लावावा तत्काल उपाययोजना केली नाही, तर पुढील वेळेत वाहन कोंडीची समस्या हाताबाहेर जाऊ शकते असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू; ५ वर्षात केवळ २३ टक्के काम पूर्ण

### प्रकल्प पूर्णत्वासाठी मे २०२८ उजाडणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.१५, मुंबई :** वांद्रे-वरळी सागरी सेतूचा विस्तार वर्सोव्यापर्यंत करण्यासाठी

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास म हामंडळाकडून (एमएसआरडीसी) वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या कामास २०१९ मध्ये सुरुवात झाली असून ५ वर्षात या प्रकल्पाचे केवळ २३ टक्के काम पूर्ण झाले आहे. आव्हानात्मक काम आणि २०२० ते २०२२ दरम्यान काही कारणाने काम पूर्णत बंद असल्याने त्याचा फटका या प्रकल्पाला बसला आहे. त्यामुळेच हा प्रकल्प २०२५ ऐवजी आता मे २०२८ मध्ये पूर्ण होणार आहे. मुंबई शहर आणि पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडी दूर करून प्रवास अतिवेगवान करण्यासाठी सागरी सेतू प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत एमएसआरडीसी कडून वांद्रे ते वरळी सागरी सेतू बांधण्यात आला असून हा सेतू गेल्या काही वर्षांपासून वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. या वांद्रे-वरळी सागरी सेतूचा वांद्रे ते वर्सोवा असा विस्तार करण्याचा निर्णय घेत एमएसआरडीसीने वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू बांधण्याच्या कामास सुरुवात केली. २०१९मध्ये या १७.१७ किमीच्या सागरी सेतूच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मात्र २०१९ ते २०२२ मध्ये या प्रकल्पाचे काम केवळ अडीच टक्के झाले. टाळेबंदी आणि कंत्राटदाराच्या भागीदारीमध्ये आलेल्या अडचणींमुळे २०२० ते २०२२ दरम्यान या प्रकल्पाचे काम पूर्णत ठप्प होते.

याप्रकरणी कंत्राटदारावर कठोर दंडात्मक कारवाई ही करण्यात आली होती. शेवटी मुख्य कंत्राटदाराने या सर्व अडचणी दूर करत २०२२ पासून कामाला सुरुवात केली. दरम्यान प्रकल्पाच्या आराखड्यात काही बदलही एमएसआरडीसी ला करावा लागला. जुहू कनेक्टरला मच्छिमारांचा विरोध असल्याने हा बदल करावा लागला. २०२२ पासून खर्या अर्थाने या सागरी सेतूच्या कामाला सुरुवात झाली. तर आता कामाने वेग घेतला असून आतापर्यंत या सागरी सेतूचे २३ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. आतापर्यंत २३ टक्के काम पूर्ण झाले असले तरी सुरुवातीला अनेक अडचणी आल्याने काम ठप्प होते. पण आता मात्र काम वेगात सुरु आहे. तसेच समुद्रात काम करणे अत्यंत आव्हानात्मक असून अनेक प्रकारच्या परवानग्या सातत्याने घ्याव्या लागत आहेत. परिणामी कामास काहीसा वेळ लागत असल्याचेही अधिकार्यांनी स्पष्ट केले. तर हे काम मे २०२८ मध्ये पूर्ण करत वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल करण्यात येईल असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. हा सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल झाल्यास वाहनचालक-प्रवाशांना सागरी मार्गाद्वारे आणि सागरी सेतूद्वारे नरिमन पॉईंट ते वर्सोवा असा थेट प्रवास करता येणार आहे. मात्र त्यासाठी मुंबईकरांना मे २०२८ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे.